माहिती हवीय?

गौतमी गणेश कोळी, वरेडी कोळीवाडा.

□ बेगम अख्तर व निर्मलादेवींचा पहिला चित्रपट कोणता?

— बेगम अख्तरचा पहिला चित्रपट *नल दमयंती*. निर्मला देवींचा पहिला चित्रपट *शारदा*.

ज्योती मनोहर कोळी, वरेडी हामरापूर.

□ जुन्या *दो आँखे बारह हाथ* व *ताजमहल*ची नायिका कोण होती?

— *दो आँखे बारह हाथ*ची नायिका होती संध्या. *ताजमहल* या नावाचा चित्रपट दोन वेळा निर्माण झाला. पहिला १९४१ ला. दुसरा १९६३ला. १९४१च्या *ताजमहल*ची सरोजिनी. १९६३च्या *ताजमहल*ची नायिका बीना राय.

संदेश भालचंद्र कोळी, वरेडी कोळीवाडा.

□ विद्या सिन्हाचा पहिला चित्रपट कोणता?

— *राजा काका*.

संदेश भालचंद्र कोळी, वरेडी कोळीवाडा.

□ *वो कौन थी*मधील 'शोख नजर की बिजलीयाँ...' हे गाणं पडद्यावर कोणी गायलंय?

— अभिनेत्री परवीन चौधरीने.

संदेश भालचंद्र कोळी, वरेडी कोळीवाडा.

□ अनिल कपूर व जूही चावला कोणकोणत्या चित्रपटात एकत्र चमकले?

— *अंदाज, बेनाम बादशहा, दिवाना मस्ताना, झुठ बोले कौआ काटे*.

कृष्णा अंबाजी कोळी, वरेडी कोळीवाडा.

□ राजा परांजपे यांचा पहिला चित्रपट कोणता?

— १९३७चा *प्रतिभा* राजा परांजपे यांनी भूमिका केलेला पहिला चित्रपट आणि १९४८चा *बलिदान* त्यांनी दिग्दर्शित केलेला पहिला चित्रपट.

कृष्णा अंबाजी कोळी, वरेडी कोळीवाडा.

□ शम्मी कपूर व गीता बाली यांनी एकत्र भूमिका केलेला पहिला चित्रपट कोणता?

— *रंगीन रातें*! पण या चित्रपटात गीता बाली शम्मी कपूरची नायिका नव्हती. पुरुषी पेहरावात या चित्रपटात तिने शम्मी कपूरची या चित्रपटातील नायिका माला सिन्हा हिच्या भावाची भूमिका केली होती. नायक-नायिका म्हणून त्या दोघांनी एकत्र भूमिका केलेला पहिला चित्रपट *मिस कोका-कोला*.

प्रतिभा प्रकाश कोळी, वरेडी कोळीवाडा.

□ जब्बार पटेलनी दिग्दर्शित केलेला पहिला चित्रपट कोणता?

— १९७५चा *सामना*.

चंचला चंद्रकांत कोळी, वरेडी कोळीवाडा.

□ सनी व बॉबी देओलचा पहिला चित्रपट कोणता? नायिका कोण?

— सनीचा पहिला चित्रपट *बेताब*. नायिका अमृता सिन्हा. बॉबीचा पहिला चित्रपट *धर्मवीर*. या चित्रपटात बालकलाकार म्हणून छोट्या धर्मेंद्रच्या भूमिकेत चमकला होता. त्याने नायकाची भूमिका केलेला पहिला चित्रपट *बरसात*. नायिका ट्विंकल खन्ना.

संदेश भालचंद्र कोळी, वरेडी कोळीवाडा.

□ वहिदाने दिलीप, राज, गुरुदत्त, अशोककुमार व संजीवकुमार यांच्याबरोबर कोणकोणत्या चित्रपटात नायिकेची भूमिका केली?



तिसरी कसममध्ये राज कपूरसह वहिदा

— वहिदा अशोककुमारबरोबर कोणत्याही चित्रपटात नायिकेच्या भूमिकेत चमकली नाही. *राखी*मध्ये ती अशोककुमारची बहीण बनली होती. *दिल दिया दर्द लिया, राम और श्याम, आदमी, मशाल* हे दिलीपकुमारबरोबरचे तिचे चित्रपट. *एक दिल सौ अफसाने, तिसरी कसम* हे तिचे राज कपूरबरोबरचे चित्रपट. *प्यासा, बारह बजे, कागज के फूल, चौदहवी का चांद, साहब बीवी और गुलाम* हे तिचे गुरुदत्तबरोबरचे चित्रपट. *मनमंदिर, सुबह और श्याम, त्रिशूल, नमकीन* हे तिचे संजीवकुमारबरोबरचे चित्रपट.

संगीता नरेश कोळी, वरेडी कोळीवाडा.

□ राजेश खन्नाने शबाना आजमी व हेमा मालिनी यांच्याबरोबर कोणकोणत्या चित्रपटात नायकाची भूमिका केली?

— *थोडी सी बेवफाई, अमरदीप, अवतार, आज का एम. एल. ए. रामअवतार* या चित्रपटात शबानाबरोबर आणि *अंदाज, प्रेमनगर, पलको की छाँव में, बंदीश, दर्द, कुदरत, बाबू, विजय, पाप का अंत, बेगुनाह* या चित्रपटांत हेमा मालिनीबरोबर.

संतोष हालकुडे, कुर्डूवाडी.

□ अमिताभ व स्मिता पाटील कोणकोणत्या चित्रपटांत एकत्र चमकलेत?

— *नमक हलाल, शक्ती* या दोन चित्रपटांत.

बी. ए. तुरे, आपटा न्यू कोळीवाडा.

□ अजय देवगण व करिश्मा कपूर कोणकोणत्या चित्रपटात एकत्र आले?

— *जिगर, धनवान, संग्राम, शक्तिमान, सुहाग*.

रविना रमेश तुरे, आपटा कोळीवाडा.

□ जितेंद्र व रेखा या जोडीचे चित्रपट कोणते?

— *एक बेचारा, अनोखी अदा, दिलदार, अपना बना लो, एक ही भूल, जुदाई, मेहंदी रंग लायेगी, नियत, एक ही रास्ता, जलमहल, माँग भरो सजना, निशान, प्रेम तपस्या, रास्ते प्यार के, जाल, सदा सुहागन, लॉकेट, अपने अपने, अमीर गरीब, मेरा पती सिर्फ मेरा है, शेषनाग, सौतन की बेटी, इन्साफ की देवी, गीतांजली* या चित्रपटात.

अशोक कोर्टीकर, पंढरपूर.

□ *दोन घडीचा डाव* या चित्रपटात राजा गोसावीची नायिका कोण होती? या जोडीचे अन्य चित्रपट कोणते?

— स्मिता तथा कामिनी कदम *दोन घडीचा डाव*मध्ये राजा गोसावीची नायिका होती. *आंधळा मागतो एक डोळा, गाठ पडली ठका ठका, नवरा म्हणू नये आपला* हे त्या दोघांच्या जोडीचे अन्य चित्रपट. ●

सौ. सुधा अशोक कोर्टीकर, पंढरपूर.

□ दादासाहेब फाळके पुरस्कार केव्हा सुरू झाला?

— १९७० साली दादासाहेब फाळके यांच्या जन्मशताब्दीचं वर्ष होतं. यावर्षी चित्रपट व्यवसायाची सेवा ज्यांनी प्रदीर्घ काळ केली आहे अशा कलावंतांचा गौरव करण्यासाठी फाळकेंच्या नावाचे हे पारितोषिक सुरू करण्यात आले.

